# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ / फाल्गुन २०, १९४७ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, दिव्यांग कल्याण, अपारंपारिक ऊर्जा मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१) * ७०७४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यात दगडी कोळशाचे मुबलक साठे असून गोवरी, सास्ती, धोपटाळा, पोवनी, साखरी, गोयेगांव, अंतरगाव परिसरात वेकोलिच्या माध्यमातून खुल्या कोळसा खाणीचे जाळे निर्माण केले असून सदर कोळसा खाणींमुळे तसेच कोळसा भरलेल्या ट्रकवर ताडपत्री न टाकता मोठ्या प्रमाणात कोळसा वाहतूक करण्यात येत असल्याने राजुरा तालुक्यातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे तसेच शेतीतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन शेतीची नापिकता वाढत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेकोलीच्या खुल्या कोळसा खाणीतून सिमेंट कंपन्यांकरीता इतर ठिकाणी कोळशाची वाहतूक केली जात असून, सदर वाहतूक ही वाहतुकीचे नियम डावलून अहोरात्र केली जात असल्याने परिसरातील रस्त्यांचे मागील वर्षी केलेले बांधकाम बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे तसेच या वाहतुकीमुळे गोवरी,पोवनी, राजुरा, सास्ती,रामपूर, राजुरा मार्गावर अनेक अपघात होऊन नागरिकांना नाहक जीव गमवावा लागला असून अपघातांमध्ये वाढ देखील झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजुरा तालुक्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून कोळशाची वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकांवर तसेच सदर वाहतुकीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी दखल घेऊन राजुरा तालुक्यातील कोळसा खाणींमुळे तसेच कोळशाच्या वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी तसेच अपघात टाळण्याकरीता नियम व अटीं निश्चित करून त्याद्वारे कोळसा उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यात गोवरी, सास्ती, धोपटाळा, पोवनी, साखरी, गोयेगाव व अंतरगाव परिसरात वेकोली, बल्लारपूर क्षेत्रांतर्गत खुल्या कोळसा खाणी कार्यरत आहेत संबंधित कंपनीमार्फत कोळसा वाहतुकी दरम्यान वाहनांवर ताडपत्रीचा वापर केला जात असून खाण परिसरात धूळ कमी करण्यासाठी नियमित पाणी फवारणी केली जाते. तसेच, शेतीवरील परिणामाबाबत जिल्हा कृषी अधीक्षक, चंद्रपूर यांचेकडे तक्रार अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही.जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर यांच्या अहवालानुसार, श्वसन विकाराशी संबंधित रुग्णांच्या संख्येमध्ये कमी-जास्त वाढ झाल्याचे दिसून येते. तथापि, सदरचे आजार केवळ कोळसा वाहतूक अथवा कोळसा खाणीमुळेच झाले आहेत, हे निश्चितपणे सांगता येणे शक्य नाही.या परिसरातील कोळसा वाहतुकीमुळे आजूबाजूच्या शेतीतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन शेतीची नापिकता वाढत असल्याबाबतची कोणतीही तक्रार तालुका कृषी अधिकारी अथवा तहसिलदार, राजुरा यांचे कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) वेकोलिच्या खुल्या कोळसा खाणीतून सिमेंट कंपन्याकरीता तसेच कोल वॉशरीज ला राजुरा-माथरा-पवनी- कोंढाळा-गाडेगाव-अंतरगाव या हायब्रिड ॲन्युईटी (HAM)-१४३ पवनी-वनसडी अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नवीन रस्त्यावरुन कोळशाची वाहतूक होत आहे.बहुतांश रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कॉंक्रीट करण्यात आले असून सुस्थितीत आहेत.जिल्हा पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या अहवालानुसार, स्थानिक पोलीस पथकाकडून वेळोवेळी वाहनांची तपासणी केली जाते. याअनुषंगाने, या परिसरात कोळसा वाहतूक करणाऱ्या ट्रकवर ताडपत्री आच्छादन व चुकीच्या पध्दतीने रस्त्याच्या लगत वाहन उभे करुन, वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या ३५५ वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२४ मध्ये १९ व २०२५ मध्ये १२ अपघात झाल्याची नोंद झाल्याचे कळविले आहे.

(४) व (५) प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अटी व शर्तीनुसार कोळसा खाणीमध्ये प्रदूषण होऊ नये याकरीता, कोळसा खाण परिसरात पाणी फवारणी यंत्रणा, सतत हवा गुणवत्ता केंद्र उभारणे, खाणीतील रस्त्यावर पाणी फवारणे, झाडे लावणे व संवर्धन करणे इ. सर्व आवश्यक उपाययोजना वेकोलीमार्फत केल्या जातात. कोळसा वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी व अपघात टाळण्याकरीता, वाहतूक नियंत्रण शाखेकडून वेळोवेळी रस्त्यांवरील वाहनांची कडक तपासणी मोहीम, आवश्यक तेथे गुन्हे दाखल करणे, नागरिकांना, शालेय,महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, सामाजिक कार्यकर्ते यांची बैठक घेऊन, मार्गदर्शन करणे इ. उपाययोजना राबविल्या जात आहेत.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील विविध रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२) * ६८०९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळात गेल्या काही वर्षांपासून विविध पदांवर मोठ्या प्रमाणात कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलेली असून या भरती प्रक्रियेमध्ये अनेक अनियमितता, कायद्याचे उल्लंघन आणि कंत्राटी कामगारांच्या हक्कांचे उल्लंघन झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळात मागील पाच वर्षांत (सन २०२० ते २०२५) कंत्राटी पध्दतीने कोणकोणत्या व किती पदांसाठी पदभरती करण्यात आलेली असून, सदरहू पदभरती करताना कामगार कायद्यातील तरतुदी, विशेषतः कंत्राटी कामगार (नियमन आणि उच्चाटन) अधिनियम, १९७० "Contract Labour (Regulation and Abolition) Act, १९७०" च्या नियमांचे पालन करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळातील नियमित पदे रिक्त असताना, कायमस्वरूपी भरती प्रक्रिया राबविण्याऐवजी कंत्राटी पध्दतीने, नियमित कर्मचाऱ्यांपेक्षा अधिकचे वेतन देऊन १७,५०० पदे भरण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवांबाबत मा.न्यायालयीन स्तरावर किंवा कामगार आयुक्तांकडे दाखल असलेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन स्थायी स्वरूपाचा निर्णय घेण्याच्या अनुषंगाने धोरण निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) नाही.

(२) रा.प.कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्यामुळे संप कालावधीमध्ये प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणुन जानेवारी २०२२- ते एप्रिल २०२२ या कालावधीमध्ये ९ बाह्य संस्थाद्वारे चालक पदांसाठी ३० विभागांमध्ये २१२५ चालकांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आली होती. रा.प. महामंडळात चालकांची पदे रिक्त ठेवून कोणतीही भरती करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे कंत्राटी कामगार (नियमन आणि उच्चाटन) अधिनियम, १९७० लागु होत नाही.

(३) रा.प.महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारणाबाबत गठीत करण्यात आलेल्या दिनांक २५/०८/२०२१ रोजीच्या उपसमितीच्या बैठकीमध्ये महामंडळामध्ये कर्मचारी भरतीवर निर्बंध घालुन अर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईपर्यंत आवश्यकता असेल तर फक्त कंत्राटी कर्मचारी सेवेत घेण्यात यावे असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यानुसार महामंडळ ठराव क्र.२०२५:०५:२९, दिनांक ०७/०५/२०२५ अन्वये कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याबाबत बाह्य संस्थेची निवड करण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर निविदा प्रक्रियेत किमान वेतन अधिनियमामधील तरतुदी आधारभुत पाया गृहित धरून कंत्राटी कामगारांच्या वेतनाची गणना करण्यात आलेली आहे.

(४) व (५) घटकसवंर्ग वर्ग-३ व वर्ग -४ पदामधील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवांबाबत मा.न्यायालयीन स्तरावर किंवा कामगार आयुक्तांकडे कोणतेही प्रकरण रा.प.महामंडळस्तरावर प्रलंबित नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील सावरी (ता.जावली) व पाचुपतेवाडी (ता.कराड) येथे अंमली पदार्थ निमिर्तीचे कारखाने सुरू असल्याबाबत

**(३) * ७४६८ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरी (ता.जावली, जि.सातारा) गावापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या माणिक टेंबर जंगल परिसरातील एका जळालेल्या वाड्यात अंमली पदार्थ निर्मितीचा अवैध कारखाना सुरू असून पाचुपतेवाडी (ता.कराड, जि.सातारा) या गावच्या डोंगरी भागात आणि कराड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एम.डी. हा अंमली पदार्थ तयार करणारा कारखाना सुरू असल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाड्यातून कोट्यवधी रुपयांच्या अंमली पदार्थाची निर्मिती व तस्करी सुरू असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून आतापर्यंत किती किंमतीच्या अंमली पदार्थाचा साठा, कच्चा माल व उपकरणे जप्त करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, पाचपुतेवाडी या गावात पोल्ट्री शेडमध्ये तयार होत असलेल्या एम.डी. निर्मितीच्या कारखान्यावर पुणे विभागाच्या महसूल गुप्तचर संचालनालयाने दिनांक २४ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून ५५ कोटी रूपयांचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गंभीर व संघटीत स्वरूपाच्या गुन्ह्याबाबत शासनाने सखोल चौकशी करण्याचे आदेश देऊन, सदर चौकशी कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात येत असून या प्रकरणात आतापर्यंत किती व्यक्तींना अटक करण्यात आली आहे, तसेच सदर अंमली पदार्थाच्या कारखान्याचे राज्यांतर्गत किंवा आंतरराज्यीय अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या नेटवर्कशी संबंध असल्याचे तपासात उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर अंमली पदार्थ निर्मिती करणारे कारखाने दीर्घकाळ सुरू असताना स्थानिक पातळीवरील प्रशासकीय, पोलीस किंवा अन्य संबंधित यंत्रणांकडून दुर्लक्ष अथवा हलगर्जीपणा झाला असून संबंधित दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द तसेच कारखाना चालविणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) कक्ष-७, गुन्हे शाखा, मुंबई यांनी त्यांच्याकडे एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क),२२(क),२९ अन्वये दाखल वि.स्था.गु.र.क्र.१६५/२०२५, गुन्ह्याच्या तपासा दरम्यान दिनांक १३/१२/२०२५ रोजी सावरी गाव, पो. बामनोली, ता.जावळी, जि.सातारा या ठिकाणी कारवाई केली. सदर कारवाईत अवैधरित्या एम.डी. बनविण्याच्या कारखान्यामध्ये एकूण ४६ किलो ३३८ ग्रॅम वजनाचा रुपये ११५,००,००,००० किंमतीचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ व एम.डी. बनविण्याचे साहित्य तसेच इतर वस्तू हस्तगत करण्यात आल्या आहेत.

सदर गुन्ह्यात एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच सदरचा गुन्हा गंभीर व संघटीत स्वरुपाचा असल्याने गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ मधील कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्यात आला आहे व गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

तसेच महसूल गुप्तचर संचालनालय, पुणे युनिट (डी.आर.आय.) यांनी दिनांक २४/०१/२०२६ रोजी पाचपुतेवाडी, ता.कराड, जि.सातारा येथे पोल्ट्री शेड मध्ये चालू असलेल्या अंमली पदार्थ कारखान्यावर छापा टाकून कारवाई केली.सदर कारवाईत एकूण ५५ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यात ६ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

(५) दिनांक १३/१२/२०२५ रोजी मेढा पोलीस ठाणे हद्दीतील सावरी गावामध्ये करण्यात आलेल्या कारवाईचे अनुषंगाने प्रभारी अधिकारी, मेढा पोलीस ठाणे यांची प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीच्या अनुषंगाने पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर यांच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

तसेच दिनांक २४/०१/२०२६ रोजी तुळसण परिसरातील पाचपुतेवाडी ता.कराड येथे केलेल्या कारवाईचे अनुषंगाने कराड तालुका पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांची प्राथमिक चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी विभाग, कॅम्प वडूज यांचेकडे सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोवंडी, मानखुर्दसह दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये नवजात बालकांची विक्री करण्यात येत असल्याबाबत

**(४) * ६६५७ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दाट लोकवस्ती असलेल्या भागांमध्ये विशेषत: गोवंडी, मानखुर्दमध्ये नवजात बालकांची विक्री करणाऱ्या टोळ्या कार्यरत असून, सदर टोळ्यांमार्फत खाजगी, शासकीय प्रसुतिगृहांतून तसेच वस्त्यांतून गरोदर महिलांची व त्यांच्या आर्थिक, कौटुंबिक परिस्थितीची माहिती घेऊन उक्त महिलेच्या कुटुंबियांना मुल विक्री आणि त्यातून होणारा आर्थिक फायदा सांगून नवजात बालकांची विक्री करण्यास भाग पाडण्यात येत असल्याची बाब पोलिसांच्या कारवाईतून माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवजात बालकांची विक्री करणाऱ्या टोळ्या अपत्य न होणाऱ्या दाम्पत्यांची माहिती आयव्हीएफ केंद्रांमधून मिळवून आणि दोन्ही बाजूंच्या लोकांना विश्वासात घेऊन बालकांच्या विक्रीचा व्यवहार करित असल्याचे पोलीस कारवाईतून उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि मुंबईतील दाट लोकवस्ती असलेल्या भागांमध्ये विशेषत: गोवंडी, मानखुर्दमध्ये नवजात बालकांची विक्री करणाऱ्या टोळ्यांवर कोणती कारवाई केली तसेच अशा घटना घडू नयेत यासाठी कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

गोवंडी येथील एका खाजगी प्रसुतीगृहातील डॉक्टर आरोपी व इतर यांनी नवजात बालकाची विक्री केल्याबाबत शिवाजीनगर पोलीस स्टेशन,गोवंडी येथे गु.र.क्र.८६१ / २५ नुसार दिनांक १६/११/२०२५ रोजी कलम ९३, १४३(४), ३(५) भा. न्या. सं., सह कलम ७५, ८१ अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, सह कलम ८, २५ जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम,सह कलम ३३, ३६ महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तथापि, नवजात बालकाची विक्री करण्यास भाग पाडणाऱ्या टोळया कार्यरत असल्याचे आढळून आले नाही.

(३) सदर गुन्ह्यातील पाच आरोपींपैकी चार आरोपी न्यायालयीन कोठडीत असून एका आरोपीला भा.ना.सु.सं.३५(३) अन्वये नोटीस देण्यात आली आहे. तसेच, गुन्ह्यातील सर्व पाच आरोपींविरूध्द दिनांक ०३/०२/२०२६ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- बाल न्याय अधिनियम,२०१५ या कायद्याअंतर्गत किमान पोलीस उप अधीक्षक दर्जाच्या अधिपत्याखाली राज्यातील सर्व ४९पोलीस घटकांमध्ये एकूण ४९ विशेष बाल पोलीस पथके कार्यरत आहेत. तसेच किमान सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची बाल कल्याण पोलीस अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली आहे. सध्या सर्व पोलीस घटकांत मिळून एकूण ११५६ बाल कल्याण पोलीस अधिकारी कार्यरत आहेत.
- महिला व बालकांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्याकरीता राज्यात एकूण ४५ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. सदर कक्षामार्फत महिला व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतात.
- अत्याचार पीडित बालकांच्या समुपदेशनाकरीता राज्यात १२४ महिला विशेष समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.
- डायल ११२ च्या माध्यमातून पीडित महिला / बालकांना तातडीची मदत पुरविण्यात येते.
- अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायद्यातंर्गत प्रकरणे निकाली काढ़ण्याकरीता मुंबई येथे एक विशेष न्यायालय स्थापन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपुर जिल्ह्यातील हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(५) * ६८११ श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर जिल्ह्यातील हवेच्या वाढत्या प्रदुषणामुळे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये ३१ पैकी २९ दिवस हवेचा गुणवत्ता निर्देशांक खराब असल्यामुळे स्थानिकांमध्ये श्वसनाचे रोग वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपुरातील हवेचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधित उद्योगांवर नियमाप्रमाणे कारणे दाखवा नोटीस, अंतरीम निर्देश, प्रस्तावित निर्देश व बँक हमी जप्त करणे याप्रमाणे कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग केल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सुरु असलेल्या चौकशीच्या अहवालाबाबत

**(६) * ६८६३ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ६७१ ला दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून भ्रष्ट मार्गाने ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक अपसंपदा संपादित केल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरू असून एक वर्ष उलटूनही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अधिकाऱ्यांविरुध्द सुरु असलेल्या चौकशीचा अहवाल अद्याप सादर केला नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने उक्त अधिकाऱ्यांविरूध्दचा चौकशी अहवाल परिवहन विभागाला कळवून संबंधित दोषी अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) रा. प. महामंडळातील कार्यरत/ सेवानिवृत्त असलेल्या एकूण ९ अधिकारी यांच्या प्रकरणी ज्ञात उत्पन्नापेक्षा अपसंपदा संपादित केल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी करण्याकरीता रा. प. महामंडळाने परवानगी/ अनुषंगीक दस्ताऐवज उपलब्ध करून दिली आहेत.

एकूण ९ अधिकाऱ्यांपैकी, श्रीमती वाघ, वरिष्ठ भांडार अधिकारी यांचेकडे अपसंपदा निष्पन्न झालेली नसल्यामुळे उघड चौकशी बंद होणेबाबत पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र यांनी मा.अपर महासंचालक-१, ला.प्र.वि, मुंबई यांना अहवाल सादर केला असून त्याबाबत रा.प.महामंडळास अवगत केलेले आहे. उर्वरीत ०८ प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशीचा निष्कर्ष रा.प.महामंडळास अप्राप्त आहे.

-----------------

## माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना विद्युत शुल्क भरण्यापासून सुट देण्याबाबत

**(७) * ७७१८ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामार्फत दिनांक २७ जून, २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण,२०२३ ला शासन मान्यता देण्यात आली असल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहिती तंत्रज्ञान (IT) आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (ITES) घटकांना मुद्रांक शुल्क माफी देण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद आहे तसेच विशेष प्रोत्साहनांपैकी विद्युत शुल्क माफी देण्याची तरतूद स्पष्टपणे करण्यात आली असून महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियमाच्या तरतुदीनुसार नव्या IT/ITES घटकांना १५ वर्षांच्या कालावधीसाठी विद्युत शुल्क भरण्यापासून सूट प्रदान देण्यात येणार असल्याचे धोरणात नमूद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धोरण प्रवर्तनास सुमारे तीन वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही, IT/ITES युनिटसाठी असलेले “विद्युत शुल्क माफीची” अधिसूचना ऊर्जा विभागाकडून अद्याप प्रसिध्द झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऊर्जा विभागामार्फत संबंधित प्रक्रिया पूर्ण करून विद्युत शुल्क माफीचे नोटीफिकेशन जारी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण, २०२३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या विद्युत शुल्क माफीच्या संदर्भात अधिसूचना निर्गमित करण्याच्या अनुषंगाने उद्योग विभाग व विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याने कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील चाकण औद्योगिक वसाहती मधील विविध कंपन्या नियमांचे उल्लंघन करित असल्याबाबत

**(८) * ६९८४ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) परिसरातील औद्योगिक वसाहतीमधील वाढते औद्योगिकीकरण, वाहनांची मोठी संख्या, धूळ मिश्रित हवा व रसायन युक्त पाणी यामुळे पाण्याचे प्रदूषण तसेच ध्वनिप्रदूषण धोकादायक पातळीवर पोहोचले असल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदूषण नियंत्रण मंडळाने औद्योगिक वसाहत परिसरात नियमित तपासण्या कराव्यात, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योग कंपन्यांवर कारवाई करावी, औद्योगिक वसाहत परिसरात हरित पट्टा वाढवावा, अशी मागणी पर्यावरण प्रेमींकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही उद्योग कंपन्यांकडून प्रक्रिया न केलेले सांडपाणी ओढे, नाले यांचेसह इंद्रायणी व भीमा नदीत सोडले जात असल्याने नदीचे पाणी, कूपनलिका, विहिरी यातील भूजल प्रदूषित झाल्याने पाणी पिण्यायोग्य राहिलेले नसून मासे व इतर जलचर मृत्यूमुखी पडत असून सदर परिसरातील नागरिकांमध्ये श्वसनविकार, दमा, खोकला, डोळ्यांचे विकार आदींचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यावरणाचा ऱ्हास करून सांडपाणी प्रकिया न करता नदी व नाल्यात सोडणाऱ्या उद्योग व कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सन २०२५ मध्ये सदर प्रश्नाधीन परिसरातील एकूण ४ उद्योगांना प्रस्तावित आदेश ०१ उद्योगास अंतरिम आदेश व ४ उद्योगास ताकीद नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत. तसेच नागरी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत चाकण

नगरपरिषद चाकण यांना फौजदारी खटला का दाखल करु नये, याकरीता दिनांक ०३/०९/२०२५ रोजी निर्देश व जल प्रदूषणाबाबत दिनांक १९/०८/२०२५रोजी प्रस्तावित निर्देश दिले आहेत. तसेच, चाकण नगरपरिषदेस दिनांक २४/०२/२०२६ च्या पत्रान्वये घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ चे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून प्राप्त अहवालानुसार नदीचे पाणी थेट पिण्यासाठी वापरले जात नाही व नदीकाठच्या गावांमध्ये दैनंदिन सर्वेक्षणामध्ये व बाह्यरुग्ण विभागामध्ये किरकोळ रुग्ण संख्या वगळता जलजन्य साथीचा उद्रेक झालेला नाही.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास पाहणीवेळी चाकण औद्योगिक क्षेत्रातील उद्योगामधून त्यांचे सांडपाणी नदी नाल्यात सोडत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बाईक टॅक्सी सेवा कंपन्यांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(९) * ७६३२ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुचाकी टॅक्सी सेवांसाठी उबेर, ओला, रॅपिडो आदी कंपन्यांकडून केवळ विद्युत (इलेक्ट्रिक) दुचाकींचाच वापर करणे बंधनकारक करण्यात आले असतानाही शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन करून अनेक ठिकाणी इंधनावर चालणाऱ्या दुचाकींच्या माध्यमातून प्रवासी सेवा सुरू असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दुचाकी टॅक्सी सेवा १०० टक्के इलेक्ट्रिक वाहनांवर चालविण्याचा शासन निर्णय असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे व संबंधित कंपन्यांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात दुचाकी टॅक्सी सेवेमध्ये केवळ इलेक्ट्रिक वाहनांचाच वापर होण्यासाठी तपासणी यंत्रणा, ऑनलाईन पडताळणी व्यवस्था व अंमलबजावणी यंत्रणा बळकट करण्यासाठी तसेच शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित कंपन्या व सेवा प्रदात्यांविरुध्द परवाना अटींचे उल्लंघन, दंडात्मक कारवाई अथवा सेवा स्थगिती करून कंपनीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) होय.

महाराष्ट्र बाईक - टॅक्सी नियम-२०२५ मधील तरतुदीनुसार बाईक-टॅक्सी १०० टक्के इलेक्ट्रिक असणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ तरतुदीचे उल्लंघन करतांना आढळून आलेल्या वाहनांवर कडक कार्यवाही करण्याचे आदेश सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना देण्यात आले आहेत. त्याप्रमाणे वायुवेग पथकांमार्फत तपासणी करण्यात येते व दोषी आढळून आलेल्या वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते. माहे एप्रिल २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण-९३०

दुचाकींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून रुपये २३,९२,७५०/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.
(३)महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कंपन्यांविरुध्द विविध पोलीस स्थानकांत २० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुमरकोटी (ता.भामरागड, जि.गडचिरोली) गावात वीज पुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१०) * ७२३१ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या पूर्वेकडील अतिसंवेदनशील आणि दुर्गम अशा तुमरकोटी (ता.भामरागड, जि.गडचिरोली) गावात ४५ घरे असून, या गावामध्ये सन २०२० मध्ये विदयुत खांब उभारले असून विजेचे मीटर देखील बसविण्यात आले आहेत, परंतु गावामध्ये अद्यापही वीजपुरवठा करण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तुमरकोटी गावातील घरांमध्ये प्रत्यक्षात वीज प्रवाहित झालेली नसूनही महावितरण कंपनीच्या प्रशासनाच्या गलथान कामकाजामुळे गावातील लोकांना विजेची देयके देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या विजेसारख्या पायाभूत सुविधेपासून तुमरकोटी गाव वंचित असताना सदर गावात वीज पुरवठा उपलब्ध करून देण्यास अनास्था दाखविणाऱ्या महावितरण कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, शासनाने तुमरकोटी (ता.भामरागड, जि.गडचिरोली) गावात वीज पुरवठा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तुमरकोटी (ता.भामरागड, जि.गडचिरोली) या गावामध्ये सुमारे ४२ घरांची लोकवस्ती आहे. माहे-जुलै २०२२ मध्ये विद्युत खांब उभारुन वीज प्रवाह सुरु करण्यात आलेला होता.तसेच जुलै २०२२ मध्ये ४ कुटूंबांनी महावितरण कंपनीकडे मागणी केल्यानुसार वीज जोडणी देण्यात आली होती.
(२) हे खरे नाही.

माहे-फेब्रुवारी २०२५ मध्ये वीज बिलाचा भरणा न केल्यामुळे सदर चार वीज ग्राहकांच्या घरातील विद्युत पुरवठा नियमानुसार कायमस्वरुपी खंडित करण्यात आला होता.त्यापैकी तीन वीज ग्राहकांनी दिनांक ०९/०२/२०२६ रोजी थकबाकीचा भरणा केल्यामुळे त्यांना माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये नवीन विद्युत जोडणी देण्यात आली आहे.

(३) व (४) सदर गावातील १२ घरांसाठी नवीन वीज जोडणीकरीता माहे-फेब्रुवारी, २०२६ रोजी मागणीपत्राचा भरणा केला असून, त्यांना फेब्रुवारी, २०२६ रोजी विद्युत पुरवठा देण्यात आला आहे. सदर गावात आजमितीस १५ घरांकरीता विद्युत पुरवठा सुरु असून, उर्वरित कुटुंबांना देखील वीजपुरवठा घेण्यासाठी महावितरण कंपनीकडून प्रोत्साहित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील न्यायालयांच्या सुरक्षिततेकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(११) * ७२६६ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मा.मुंबई उच्च न्यायालय, वांद्रे येथील किल्ला कोर्ट आणि मा.नागपूर जिल्हा न्यायालय या न्यायालयांसह मुंबई, नागपूर, अहिल्यानगर, नाशिक आणि अन्य जिल्ह्यांमधील न्यायालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारे निनावी ई-मेल किंवा संदेश माहे डिसेंबर, २०२५ मध्ये प्राप्त झाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाच्या सायबर पोलीस विभागामार्फत या ई-मेलसच्या आय.पी. ॲड्रेसचा (IP Address) व संशयित आरोपींचा तपास सखोलपणे सुरू केला आहे काय, तपासात काय निष्पन्न झाले, सदर घटनांमध्ये काही संघटित गुन्हेगारी गट आहेत किंवा कसे याबाबतचा तपास केला आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी गंभीर दखल घेऊन राज्यातील सायबर पोलिसांकडे वारंवार येणाऱ्या अशा निनावी धमक्यांमुळे निर्माण होणारा संभ्रम व कामकाजात येणारा व्यत्यय टाळण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी तसेच न्यायालयीन परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई येथे मा.उच्च न्यायालय बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीबाबत ०१ तसेच किल्ला कोर्ट, बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीबाबत ०१ असे एकूण ०२ अदखलपात्र गुन्हे दाखल आहेत.

सदर गुन्ह्याच्या तपासात नमूद ईमेलचे तांत्रीक विश्लेषणाद्वारे तपास केला असता, सदरचा ईमेल आर्यलंड या देशातून आल्याचे प्राथमिकदृष्टया तपासात निष्पन्न झाले असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

मा.जिल्हा सत्र न्यायालय नागपुर यांच्या ईमेल आयडीवर अज्ञात मेल आयडीवरुन बॉम्ब स्फोट होणार असल्याची धमकी दिली. त्यानुषंगाने पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत पोलीस ठाणे सदर येथे दिनांक १८/१२/२०२५ रोजी एन.सी.आर.नं. ०९८७/२०२५, कलम ३५१ (४) अन्वये अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर अज्ञात ई-मेल आयडी तयार करतेवेळी तसेच २FA Identification करतेवेळी संशयीत व्यक्तीने स्वतःचा आयपी पत्ता व स्थान लपविण्याकरीता tor email सर्विसचा वापर केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

तसेच अहिल्यानगर, नाशिक जिल्ह्यांमधील न्यायालय बॉम्बने उडवून देण्याची धमकीबाबत डिसेंबर २०२५ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी प्राप्त नाहीत.

(३) निनावी धमक्यांबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर तात्काळ प्रचलित कायद्यानुसार कारवाई करून स्थानिक पोलीस ठाणे तसेच सायबर सेल यांचे कडून प्राप्त ईमेल त्याचबरोबर मोबाईल क्रमांक यांचे तांत्रीक विश्लेषणाद्वारे पुढील तपास केला जातो.

न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय, इतर महत्वाच्या ठिकाणी प्रवेशद्वारा जवळ तसेच परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य त्या पोलीस मनुष्यबळ व साधन सामुग्रीनिशी बंदोबस्त तैनात करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या सीमावर्ती भागातील तपासणी नाक्यांवर परराज्यातून येणाऱ्या पशुधनाची तपासणी करून लसीकरण करण्याबाबत

**(१२) * ७७९१ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत वर्षाप्रमाणे यावर्षीही पशुधनांमध्ये ‘लम्पी स्किन’ (Lumpy Skin) या रोगाचा मोठा प्रादुर्भाव झाला असून सीमावर्ती भागातील स्थानिक बाजारांतून हा संसर्ग राज्यातील पशुधनात पसरल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुजरात व इतर राज्यांतून येणाऱ्या पशुधनांमध्ये ब्रुसेलोसिस, टीबी (क्षय) आणि थायलेरिओसिस यांसारख्या गंभीर विषाणूजन्य व जिवाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत असून पशुपालक खरेदीपूर्वी त्यांची तपासणी करित नसल्यामुळे राज्याच्या पशुधनाचे आणि पर्यायाने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास पशुसंवर्धन विभागाच्या पुनर्रचनेत जव्हार, किनवट, उदगीर, रावेर, मिरज व चंद्रपूर येथील तपासणी नाके बंद करण्यात आले असून वाढता रोगप्रसार थांबविण्यास्ठी राज्याच्या सीमेवरील ११ कार्यरत ‘चेक पोस्ट’ द्वारे परराज्यातून येणाऱ्या पशुधनांची ब्रुसेलोसिस आणि टीबी यांसारख्या रोगांसाठी तपासणी अनिवार्य आणि लसीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२४ अन्वये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना करताना चालू असलेला एकही तपासणी नाका बंद करण्यात आलेला नाही.

कार्यरत ११ तपासणी नाक्यांवर सीमावर्ती भागातून येणाऱ्या पशुंची साथरोग प्रादुर्भाव तसेच, पशुधन आजारी नसल्याची तपासणीव्दारे खातर जमा केली जाते. तपासणी नाक्यांवर परराज्यातून येणाऱ्या पशुधनाची तपासणी करुन आवश्यकतेनुसार लसीकरण करण्यात येते. सन २०२५-२६ मध्ये जानेवारी

२०२६ अखेरपर्यंत एकूण १०,३१,७०८ पशुधनाची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ४२० पशुधनांना राज्यात प्रवेश नाकारला आहे.
(४) विलंब झाला नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ८ हजार बसेस खरेदीची निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * ७८०६ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या ग्रामीण भागात एसटी प्रवासाला प्रवाशांकडून अधिक प्रतिसाद मिळत असून त्यातून महामंडळाला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळत असल्याने एसटीच्या ताफ्यात नवीन ८ हजार बसखरेदी करून नवीन बसस्थानकांची उभारणी तसेच दुरुस्तीसाठी सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पात २४६० कोटी रुपयांची तरतूद केली असून त्यातील १६०० कोटी रुपये खर्चाविना शिल्लक आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बसचालकांच्या कामाची निविदा तसेच ८ हजार नवीन बसेस खरेदीकरीता तरतूद केली असताना या बसेस खरेदी करण्याची प्रक्रिया नऊ महिने होऊन देखील पूर्ण न झाल्यामुळे निधी खर्च होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी नवीन बस खरेदी व बस स्थानकांच्या कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याच्या दृष्टीने माहिती घेवून शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२), (३) व (४) रा. प. महामंडळामार्फत ३००० व ५००० नवीन तयार बसेस खरेदी करण्यात येत आहे. त्यापैकी ३००० वाहने खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून मे. टाटा मोटर्स यांना २१०० वाहन खरेदीसाठी खरेदी आदेश देण्यात आलेला आहे. तसेच ५००० वाहने खरेदीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. वाहन खरेदी भांडवली प्रकारची असून मोठ्या रकमेची असते. सदर बाब लक्षात घेता एसटी च्या ८००० नवीन बसेस खरेदिची निविदा प्रक्रिया रखडली असे म्हणता येणार नाही.
रा.प.बसस्थानकांच्या पुनर्बांधणी/ नुतनीकरण कामांच्या निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहेत.

-----------------

## गारगाव (ता.वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी तरुणीची तीन लाख रुपयांत विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) * ७८३१ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात २० वर्षीय आदिवासी तरुणीला लग्नाचं आमिष देऊन तीन लाख रुपयांमध्ये तिची विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला असून, सदर महिलेची विक्री आणि छळ

केल्याप्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२४ मध्ये नाशिकमधील एका व्यक्तीसोबत जबरदस्तीने लग्न लावून देण्यात आल्याचा आरोप पीडित महिलेने केला असून, प्राथमिक तपासानुसार समोर आलेल्या माहितीच्या आधारे मुलीची तस्करी करून तिचे लग्न लावून देणाऱ्या दोन लोकांना आरोपी आणि आरोपीच्या आईने कथित स्वरुपात तीन लाख रुपये दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोपी, त्याची आई आणि दोन मध्यस्थांविरुध्द वाडा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता आणि अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी आदिवासी तरूणीला लग्नाचे आमिष दाखवूण फसवणूक करणाऱ्या तसेच तिची विक्री करणाऱ्यांविरूध्द व राज्यातील तरुणींना पैसे व लग्नाचे आमिष दाखवूण फसवणूक करणाऱ्या टोळींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मौजे गारगाव (ता.वाडा, जि.पालघर) येथे मध्यस्थीला रुपये ३ लाख देऊन फिर्यादी पीडितेचे आरोपीसोबत मे,२०२४ मध्ये लग्न लावून दिले तसेच आरोपी नवरा व त्याच्या आईकडून फिर्यादी तरुणीचा छळ केल्याप्रकरणी आरोपी नवरा, त्याची आई व दोन मध्यस्थी यांचेविरुध्द वाडा पोलीस स्टेशन, पालघर येथे गु.र.नं. १३/२०२६, दिनांक ०७/०१/२०२६ रोजी कलम १४३, ८५, ११८(१), ३(५) भा.न्या.सं., सह कलम ३(१)(r) व ३(१)(s) ॲट्रॉसीटी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी आरोपी नवरा व त्याची आई यांना मा.न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजूर केल्याने त्यांना दिनांक २५/०२/२०२६ रोजी नॉमिनल अटक करण्यात आली आहे. तसेच मध्यस्थी दोन आरोपींना अनुक्रमे दिनांक १६/०२/२०२६ व दिनांक १९/०२/२०२६ रोजी अटक करण्यात आलेली असून दिनांक २०/०२/२०२६ रोजीपासून ते न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

(४) राज्यातील महिला व मुलींच्या अनैतिक मानवी वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे:-

१. अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे राज्यस्तरीय नोडल अधिकारी करण्यात आले आहे.
२. राज्यात ४५ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षांची स्थापना करण्यात आलेली आहे.
३. ३.हरविलेल्या बालकांच्या शोध घेण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये "ऑपरेशन मुस्कान" ही शोध मोहीम वेळोवेळी राबविण्यात येत आहे.
४. "अनैतिक मानवी वाहतूक" या विषयावर कायदेशीर मार्गदर्शन होण्याकरीता कार्यरत अधिकारी / अंमलदार यांचेकरीता वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पशुधनास संसर्गजन्य रोगाची लागण झाल्याबाबत

**(१५)** * **७९०० श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करोळ, पाचघर, किनिस्ते, आडोशी, पाथर्डी, सूर्यमाळ, गोमघर, सायदे (ता.मोखाडा जि.पालघर) या गावांमधील पशुधनास एका अज्ञात संसर्गजन्य रोगाची लागण झाली असल्याची बाब माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रोगामुळे पशुधनांच्या फऱ्याला सूज येणे, पोट फुगणे, गळा सुजणे, लघवी अटकणे आणि तीव्र ताप येणे अशी लक्षणे दिसून येत असून, यात आतापर्यंत ४ जनावरांचा मृत्यू झाला असून अनेक जनावरे गंभीर अवस्थेत असून सदर रोगाचे निदान करण्यासाठी शासनाने पशुवैद्यकीय पथके व प्रयोगशाळा तपासणी (Lab Testing) कार्यान्वित केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील बाधित गावांमध्ये पशुधनास लसीकरण करून आणि औषधोपचार उपलब्ध करून देण्यासाठी तसेच मृत पशुधनाच्या पशुपालकांना शासनाकडून आर्थिक मदत देण्याबाबत व भविष्यात अशा रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) पालघर जिल्ह्यातील गोमघर व सायदे या २ गावांमध्ये जनावरांना फऱ्या सदृश्य रोगाची लागण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) खरे आहे. तथापि, रोगाची लागण झाल्यामुळे एकूण ७ जनावरे बाधित झाली होती. बाधित ७ जनावरांपैकी ३ जनावरांचा मृत्यू झाला व उर्वरित ४ जनावरे उपचारानंतर बरी झाली आहेत.
(३) आजार आटोक्यात आणण्यासाठी ५ आपत्ती प्रतिसाद दले (RRT) स्थापन करून फऱ्या रोगाकरीता १९२६४ पशुधनात तात्काळ लसीकरण करण्यात आले. बाधित पशुंवर औषधोपचार व प्रतिबंधात्मक लसीकरण त्वरित पूर्ण केल्याने आजार आटोक्यात आला आहे. भविष्यात रोगराईचा प्रार्दुभाव होवून नये यासाठी नियमितरित्या लसीकरण करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड ते लिंबगाव मार्गावरील बससेवा १० वर्षांपासून बंद असल्याबाबत

**(१६)** * **७९९३ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड ते लिंबगाव हा १२ किलोमीटर अंतराचा महत्त्वाचा मार्ग असूनही या मार्गावरील राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बससेवा गत सुमारे १० वर्षांपासून पूर्णपणे बंद असल्यामुळे हजारो नागरिकांना प्रवासाकरीता खाजगी गाड्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बससेवा बंद असल्यामुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी व नोकरदार वर्गाला शिक्षण, आरोग्यसेवा व रोजगारासाठी दररोज मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतक्या कमी अंतराच्या व प्रवासी मागणी असलेल्या मार्गावरील बससेवा बंद राहण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच सदर मार्गावर बससेवा तातडीने सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२), (३) व (४) नांदेड-लिंबगाव-पूर्णा हा रेल्वे मार्ग असल्यामुळे पॅसेंजर ट्रेनची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे रा.प.बस फेऱ्यांना प्रवाशी प्रतिसाद अत्यंत कमी आहे. तसेच नांदेड-लिंबगाव-पुर्णा मार्गावर बससेवा सुरु करणेबाबत रा.प.नांदेड विभागाकडे कोणतीही प्रवाशी मागणी प्राप्त झालेली नाही.

-----------------

## नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहातून अंमली पदार्थ जप्त केल्याबाबत

**(१७)** * **८०७३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह येथील मंडल क्रमांक ७ मधील यार्ड क्रमांक १ आणि ४ मध्ये दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी सुमारे १ लाख ७ हजार ८०० रुपये किंमतीचे अंमली पदार्थ आणि ते सेवनासाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारागृहातील कडक सुरक्षा भेदून १०४ ग्रॅम चरस, ३१.५ मिलीग्रॅम गांजा सदृश पदार्थ, ४ मिलीग्रॅम एम.डी. आणि १५ रोलिंग पेपर यांसारखा साठा कारागृहाच्या आत पोहोचल्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून मोबाईल ॲपद्वारे १३ हजार रुपये पाठवून बाहेरील अज्ञात व्यक्तीच्या मदतीने हे अंमली पदार्थ अत्यंत बेकायदेशीर मार्गाने कारागृहात पोहोचविण्यात आले असून कारागृहाच्या उंच तटबंदी व सीसीटीव्ही यंत्रणा असतानाही अशा प्रकारे तस्करी झाल्यामुळे सुरक्षेचा भंग झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणामुळे कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेचा बोजवारा उडाला असून या प्रकारामुळे राज्यातील इतर कारागृहांच्या सुरक्षेविषयीही चिंता व्यक्त होत असून या संपूर्ण घटनेच्या कारणांची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास, संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी, कैदी व बाह्य व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक १०/१२/२०२५ रोजी मंडल क्रमांक ७ मधील यार्ड क्रमांक १ ते ४ या ठिकाणी साफसफाई करणारा शिक्षा बंदी दिलीप कचरु सोळंके हा यार्ड बाहेर कचरा टाकून परत येत असताना मंडल क्र. ७ च्या मुख्य प्रवेशद्वारात त्याची झडती घेतली त्यावेळी त्याच्याजवळ चिकटपट्टीमध्ये गोलाकार गुंडाळलेली वस्तू आढळली.

- तुरुंगाधिकारी यांनी केलेल्या चौकशीत सदर वस्तु गांजा व चरस असल्याचे बंद्याने सांगितले.
- बंद्याने प्राथमिक चौकशीत असेही सांगितले की, बंद्यांना दिल्या जाणाऱ्या ॲलनफोन सुविधेच्या माध्यमातून कारागृहाच्या बाहेर मोबाईल ॲपद्वारे नातेवाईकांमध्ये आर्थिक व्यवहार करवून हे अंमली पदार्थ मागविले.

- त्यानुषंगाने अधीक्षक, नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह, यांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याकरीता नाशिक रोड पोलिसांना दिनांक १७/१२/२०२५ रोजी पत्र दिले.
- फॉरेन्सिक टीमने त्या गोलाकार वस्तुची तपासणी केल्यानंतर त्यात चरस, गांजा सदृश पदार्थ, एम.डी. आणि रोलिंग पेपर असे अंमलीपदार्थ असल्याची पुष्टी मिळाली.
- तथापि, कारागृहातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सतर्कतेमुळे सदरचे अंमली पदार्थ मंडल क्र.७ च्या मुख्य प्रवेशद्वारावरच रोखता आले.
- सदर अंमलीपदार्थ कारागृहाच्या मुख्य तटबंदीच्या वरुन फेकल्याची प्राथमिक शक्यता दिसून येते.

(३) बंदी दिलीप कचरु साळुंके व बंदी स्वप्निल दिनेश उनवणे व १ अज्ञात इसम अशा एकूण ०३ जणांवर दिनांक १८/१२/२०२५ रोजी नाशिकरोड पोलीस स्टेशन, नाशिकरोड, येथे गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ च्या कलम ८ (c), २० (b) (ii), २० (B) IIA, २२ (a) व २९, अंतर्गत गु.र.क्र. ६३५/२०२५, नोंदविण्यात आला आहे.

- सदर प्रकरणी कारागृह उप महानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक, यांच्या दक्षता पथकामार्फत सखोल चौकशी सुरु आहे.
- नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहाच्या तटबंदीच्या परिसरात सुरक्षेकरीता सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची तसेच, कारागृहातील वॉच टॉवरची उंची वाढविण्याची कार्यवाही सुरु आहे.
- नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह व महाराष्ट्रातील इतर सर्व कारागृहांची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी दक्षता पथकांमार्फत विशेष झडत्या राबविण्यात येतात. तसेच, आधुनिक उपकरणे जसे की, CCTV, MOBILE DETECTOR, WALKIE-TALKIE, MOBILE JAMMER, यांसारखे अत्याधुनिक सुरक्षा उपकरणे वापरण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य रिक्षा व टॅक्सी चालक कल्याणकारी महामंडळ कार्यान्वित करण्याबाबत

**(१८) * ८२१५ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये ‘महाराष्ट्र राज्य रिक्षा व टॅक्सी चालक कल्याणकारी महामंडळ’ स्थापन करण्याची घोषणा केली होती, तसेच त्यासाठी ५० कोटी रुपयांच्या बीज निधीची तरतूद केली असूनही अद्याप हा निधी वितरित करण्यात आलेला नाही व महामंडळाचे ऑनलाईन पोर्टल विकसित करण्याचे देखील प्रलंबित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळाची घोषणा करून दीर्घ काळ उलटला तरी प्रशासकीय स्तरावर निधी वितरित न झाल्यामुळे आणि तांत्रिक कामात दिरंगाई होत असल्याने शासकीय निधीचा विनियोग वेळेत होत नाही व पर्यायाने नियोजित उद्दिष्टांचा अपव्यय होत असून महामंडळाचे कामकाज पूर्णपणे बंद असल्याने राज्यातील लाखो रिक्षा व टॅक्सी चालकांना विमा संरक्षण, वैद्यकीय मदत आणि त्यांच्या पाल्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक लाभांपासून वंचित राहावे लागत असल्याने मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळाची अंमलबजावणी प्रलंबित मागण्यांच्या आणि निधी वितरित न करण्याच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने सदर महामंडळ कार्यान्वित करण्यासाठी व पोर्टलचे काम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) नाही.

दिनांक १६/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र ऑटोरिक्षा अणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यात आले असून सदर मंडळ स्वायत्त व स्वयंपूर्ण व्हावे यासाठी शासनाकडून एकवेळचे अनुदान रुपये ५० कोटी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक १०/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो-रिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकरीता अनुदान स्वरुपात रुपये ५०.०० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे.

ऑनलाईन पध्दतीने मंडळाची सभासद नोंदणी सुरु करण्यात आली असून दिनांक ०७/०७/२०२५ पासून दिनांक २२/०२/२०२६ पर्यंत एकूण १३३३ सभासदांनी सभासद फी रुपये ८००/- प्रत्येकी जमा करून नोंदणी केली आहे.

(३) धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो-रिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाचे कामकाज चालविण्याकरीता राज्यस्तरीय कल्याणकारी मंडळ तसेच जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर मंडळाचे मुख्यालय मुंबई ऐवजी ठाणे ठेवण्यात आले आहे. सद्य:स्थितीत मंडळाचे मुख्य कार्यालय प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे येथे सुरू करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये अवैधरित्या तिकिट विक्री होत असल्याबाबत

**(१९) * ८३२४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये अवैध तिकिट विक्री अथवा तिकिट न देता प्रवाशांकडून भाडे वसूल करण्याच्या २४ हजारांहून अधिक प्रकरणांची नोंद झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैध तिकिटाशिवाय प्रवास व अवैध तिकिट विक्री रोखण्यासाठी शासनाने प्रादेशिक व विभागीय स्तरावर सुमारे १६ विशेष तपासणी पथके नियुक्त केली असून, या पथकांकडून माहे एप्रिल, २०२४ ते मार्च, २०२५ या कालावधीत १३ लाखांपेक्षा अधिक बसगाड्यांची तपासणी करण्यात आली व त्यातून मोठ्या प्रमाणावर अवैध तिकिट विक्री व नियमभंगाची प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध तिकिट विक्रीच्या सुमारे २४ हजार प्रकरणांमध्ये दोषी आढळलेल्या कर्मचारी अथवा संबंधित व्यक्तींविरुध्द शासन किंवा महामंडळाकडून कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, भविष्यात अवैध तिकिट विक्री रोखण्यासाठी ई-तिकिट प्रणालीचा विस्तार, ऑनलाईन व डिजिटल तिकिट तपासणी व्यवस्था, तपासणी पथकांची संख्या वाढविणे, तसेच कर्मचारी प्रशिक्षण व जबाबदारी निश्चिती यांसारख्या ठोस उपाययोजनांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) रा. प. महामंडळाद्वारे मार्ग तपासणी पथके तयार करून दैनंदीन बसेस तपासणीची यंत्रणा कार्यान्वित केली आहे. त्याद्वारे सन २०२४-२५ तपासणी अहवालानुसार एकूण १०,९८,५४४ इतक्या बसेसची तपासणी करण्यात आली असून, वेगवेगळया कारणाचे एकूण २४,९६३ प्रकरणे उघडकीस आले आहेत. त्यानुसार एकूण रुपये १९,५२,०६५/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(३) अपहार प्रकरण आढळून आलेल्या वाहकांवर जबाबदारी निश्चित करुन रा.प.महामंडळाच्या शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे.
(४) व (५) रा.प.महामंडळामध्ये ईटीआयएम प्रणाली कार्यान्वित असून सदर कार्यप्रणालीव्दारे प्रवाशांना तिकिट विक्री करण्यात येते. तसेच संगणकीय आरक्षण प्रणाली, मोबाईल ॲप व रा.प.महामंडळाच्या अधिकृत वेबसाईटवरुन आगाऊ आरक्षण करण्याची सुविधा आहे. ईटीआयएम मशीनमध्ये प्रवाशांना युपीआय पेमेंटद्वारे प्रवास भाडे अदा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

-----------------

## मुंबईतील व्यावसायिकाची फ्लॅट खरेदीत आर्थिक फसवणूक झाल्याबाबत

**(२०) * ८३३२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अंधेरी परिसरात एका बांधकाम प्रकल्पातील फ्लॅट खरेदी व्यवहारामध्ये मोठा आर्थिक लाभ मिळेल तसेच गुंतवणुकीवर सुमारे दीड कोटी रुपयांपर्यंत नफा होईल, असे आमिष दाखवून विकास प्रकल्पामार्फत फ्लॅट बुक करण्यास प्रवृत्त करून एका व्यावसायिकाची अंदाजे ७ कोटी ६१ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची गंभीर घटना दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेमुळे रिअल इस्टेट व्यवहारांमधील गुंतवणूकदारांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या प्रकरणी संबंधित तिघांविरुध्द वर्सोवा पोलीस ठाण्यात अपहार, फसवणूक व विश्वासघाताच्या कलमान्वये गुन्हा नोंद केला असून आरोपींकडून अनेक गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करताना आर्थिक व्यवहारांचा तपशील, संबंधित विकास प्रकल्पाची कायदेशीर स्थिती, व्यवहारातील कागदपत्रांची पडताळणी तसेच आरोपींच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करून सदर प्रकरणातील दोषींना अटक करून मालमत्ता जप्ती किंवा इतर दंडात्मक कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) दिनांक १६ ऑक्टोंबर २०१५ ते दिनांक २९/१/२०१९ दरम्यान गैरअर्जदार अश्विनकुमार क्षिरसागर याने गैरअर्जदार अष्टविनायक बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स चे पार्टनर उदय परब यांच्याशी संगनमत करून फिर्यादी पुरूषोत्तम वासुमल गगवानी यांना RUNAWAL ELEGANTE मध्ये फ्लॅट नं २१०४ Tower C, Emerald हा रुपये ९,१५,५४,५००/- किंमतीचा फ्लॅट अष्टविनायक बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांच्या मार्फतीने खरेदी केल्यास रुपये ७,६१,००,०००/- मध्ये मिळवून देतो असे अमिष दाखवून फिर्यादीकडून रुपये ७,६१,००,००० इतकी रक्कम RTGS द्वारे एकरकमी स्विकारली व त्यापैकी १,८१,३५,१७२ इतकी रक्कम रुनवाल बिल्डर्सकडे भरुन फिर्यादीचे कंपनीचे नावाने फ्लॅट नं २१०४ बुक केला. तसेच फिर्यादीच्या उर्वरीत रकमेतून गैरअर्जदार अश्विनकुमार क्षिरसागर याने स्वत:च्या नावाने फ्लॅट क्र. १५०२ Tower C, Emerald रुपये १,०७,८४,६९७/- भरून बुक केला. तसेच उर्वरीत रुपये ४,७१,८०,१३१/- इतकी रक्कम फिर्यादीच्या फ़्लॅट करीता रुनवाल बिल्डर्सकडे न भरता ती गैरअर्जदार उदय परब आणि श्रीकृष्ण उदय परब यांचे सोबत संगनमत करून स्वत:चे फायद्यासाठी वापरून तिचा अपहार केलेला आहे. अशा प्रकारे गैरअर्जदार यांनी संगनमत करून फिर्यादीची एकूण रुपये ७,६१,००,०००/- ची फसवणूक केल्याने वर्सोवा पोलीस ठाणे येथे दिनांक ०२/०१/२०२६ रोजी गु.र.क्र. ११/२०२६, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या अदयापपर्यंत केलेल्या तपासामध्ये अनेक गुंतवणुकदारांची फसवणुक झाल्याचे निष्पन्न झालेले नाही. सदर प्रकरणात फिर्यादी व आरोपी यांच्यामधील आर्थिक व्यवहारांचा तपशिल तपासण्यात आला आहे. आरोपींना बी.एन.एस.एस. कलम ३५ (३) अन्वये नोटीस बजावण्यात आलेली आहे. आरोपी अद्याप पर्यंत पोलीस ठाणेस उपस्थित राहिले नसून तपासात सहकार्य करत नाहीत. त्यामुळे अटकेची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील वाहनधारकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याबाबत

**(२१) * ८३९२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरासह उपनगरातील अनेक वाहनधारकांकडून वाहतुकीच्या नियमांचे पालन केले जात नसून वाहतूक पोलिसांकडून देखील यावर कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२६ पासून उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक फलक (HSRP) नसलेल्या वाहनांवर अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याची तसेच विशेषतः भायखळा, धारावी, मोहम्मद अली रोड व मुंबई उपनगरातील इतर गर्दीच्या भागांमध्ये वाहतूक नियमांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होत असून नियमबाह्य नंबर प्लेट, हेल्मेटचा वापर न करणे, सिग्नल तोडणे, अवैध पार्किंग अशा प्रकारांच्या तक्रारी सातत्याने पुढे येत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरातील अनेक फुटपाथवर महिनोमहिने उभ्या असलेल्या बेवारस गाड्या देखील या भागातील नागरिकांकडून अवैधपणे वापरण्यात येत असून याकडे वाहतूक पोलीस जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असून मुंबई शहरातील रस्त्यावरील होणारे अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांची पुरेशी संख्या वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मुंबई शहरासह उपनगरातील नियमांचे पालन न करणाऱ्या वाहन चालकांवर वाहतूक पोलीस व प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यामार्फत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाया करण्यात येतात.

(२) मुंबई शहर व उपनगरात मुंबई पोलीस वाहतूक शाखेने सन २०२५ मध्ये ई-चलनाद्वारे खालीलप्रमाणे कारवाया केलेल्या आहेत.

| वाहतूक नियमांचे उल्लंघन कारवाई संख्या | |
|---|---|
| अवैध पार्किंग | १०,४६,८१९ |
| सिंग्नलचे उल्लंघन | ४,३४,४९१ |
| नियमबाह्य नंबरप्लेट | ६५,४१६ |
| विना हेल्मेट | ४,९१,७१४ |
| एकूण कारवाई | २०,३८,४४० |

मुंबई शहर व उपनगरातील प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडून वाहनधारकांना दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०१/२०२६ या कालावधीत फॅन्शी नंबर प्लेट/नंबर प्लेट नसलेल्या १८,३६८ वाहनांची तपासणी करुन एकूण २०० दोषी वाहनांवर दंडात्मक कारवाई केली आहे. आयुक्त परिवहन यांच्याकडून उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक फलक (HSRP) नंबर प्लेट नसलेल्या वाहनांना सद्य:स्थितीत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) मुंबई शहरासह उपनगरातील फुटपाथवर उभ्या केलेल्या १६३६ वाहनांवर वाहतूक विभागाकडून सन २०२५ मध्ये कारवाया करण्यात आलेल्या आहेत. तसेच फुटपाथवरील बेवारस वाहने बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून वॉर्ड स्तरावर उचलले जातात.

मुंबई शहरासह उपनगरातील अपघात रोखण्याकरीता व वाहतुकीचे नियमन करण्याकरीता सन २०२५ मध्ये ४५२ अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सद्य:स्थितीत एकूण ३८३५ इतके मनुष्यबळ कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साक्री (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे दोन अल्पवयीन मुलींची हत्या केल्याबाबत

**(२२) * ८४५३ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (ता.भुसावळ,जि.जळगाव) येथे दोन अल्पवयीन मुलींना विहिरीत ढकलून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सदर घटनेप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून सखोल तपास करून वरिष्ठ पातळीवरून तपासाची देखरेख करण्याचे निर्देशही देण्यात आले असून तपासादरम्यान आरोपींची ओळख पटली असून त्यांना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी ग्रामीण भागात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी पोलीस गस्त वाढविणे, जनजागृती मोहीम राबविणे, संवेदनशील भागांची ओळख करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत तसेच पीडित कुटुंबीयांना आर्थिक मदत, समुपदेशन किंवा इतर सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) साक्री (ता.भुसावळ जि.जळगाव) येथे दोन अल्पवयीन मुलींना विहिरीत ढकलून त्यांची हत्या केल्याप्रकरणी भुसावळ तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५/२०२६ नुसार कलम १०३ (२),१३७ (२), ७८, ३(५) भा.न्या.सं. सह कलम १२ पोक्सो अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील दोन्ही विधि संघर्षित बालक यांची ओळख पटवून त्यांना दिनांक २८/०१/२०२६ रोजी ताब्यात घेण्यात आले असून सद्य:स्थितीत ते बालनिरीक्षणगृह, जळगाव येथे आहेत. गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(३) राज्यात महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

१) राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे.
२) महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी या उपाययोजना करण्यात येत आहेत.
३) राज्यात सर्व पोलीस ठाणे स्तरावर महिला मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.
४) लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला व बालकांना शारीरीक व मानसिक आघातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणे,वित्तीय सहाय्य देणे तसेच समुपदेशन, वैद्यकीय व कायदेशीर मदत इ.सहाय्य देण्यासाठी मनोधैर्य योजना सुरु करण्यात आली आहे.
५) महिला हेल्पलाईन क्र. १०३, १०९१, ११२ कार्यरत असून त्याव्दारे महिलांना २४*७ मदत देण्यात येते.
६) महिला/मुलींच्या संबंधित समस्यांवर संवेदनशीलपणे व तात्काळ कार्यवाही करण्याकरीता सर्व पोलीस स्टेशनमध्ये महिला सहाय्य कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुंबई सेंट्रल येथील उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या दालनात अज्ञात व्यक्तींनी घुसखोरी करून धमकविल्याबाबत

**(२३) * ८४७१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुंबई सेंट्रल येथील मध्यवर्ती कार्यालयामधील उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या दालनात काही अज्ञात व्यक्तींनी अनधिकृतरीत्या प्रवेश करून तेथील तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना दमदाटी करित धमकाविल्याची तसेच कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण केल्याची गंभीर घटना दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमुळे कार्यालयीन सुरक्षेविषयी गंभीर प्रश्न निर्माण झाले असून सदर घटनेप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी किंवा महामंडळ प्रशासनाने पोलिसांकडे गुन्हा नोंद केला असून त्याबाबत सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीदरम्यान संबंधित व्यक्तींची ओळख पटविणे, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींची चौकशी इत्यादी बाबींची पडताळणी करण्यात आली आहे काय,तसेच या प्रकरणातील दोषींवर कोणती दंडात्मक अथवा कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, सदर घटना घडण्यामागे कार्यालयीन सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी, अपुरी सुरक्षा यंत्रणा किंवा प्रवेश नियंत्रणातील कमतरता कारणीभूत असल्याचे आढळून आले असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कार्यालयीन सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२), (३), (४) व (५) दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी शनिवार असल्यामुळे मध्यवर्ती कार्यालय हे बंद होते. तसेच आसपासच्या तारखांची तपासणी केली असता अशी घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही. सदर घटना घडलेली नसल्याने पोलीसांकडे गुन्हा नोंद करण्यात आलेला नसून, चौकशी करण्यात आलेली नाही. संबंधित व्यक्तींची ओळख पटविणे, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, सुरक्षा व्यवस्थेतील तृटींची चौकशी इ. बाबींची पडताळणी करण्यात आलेली नाही.

मध्यवर्ती कार्यालयाचे परिसरात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तसेच मध्यवर्ती द्वार कचेरी येथे बाहेरून येणाऱ्या व्यक्तींची रजिस्टरवर नोंद केली जाते.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या सर्वसमावेशक विकासासाठीच्या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(२४) * ८२७३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिव्यांग व्यक्तींच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा आणि कौशल्य विकासासाठी सर्वसमावेशक व सर्वांगीण विकास साध्य करण्याच्या उद्देशाने "सर्वसमावेशक महाराष्ट्र" हा व्हिजन डाक्युमेंट कार्यक्रम तयार केला असून सदर व्हिजन डाक्युमेंटनुसार शिक्षण, आरोग्य, पुनर्वसन, रोजगार, कौशल्य विकास, संशोधन आणि जनजागृती या सात प्रमुख क्षेत्रांवर आधारित धोरणात्मक योजना तयार करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यक्रमाअंतर्गत दिव्यांग व्यक्तींना सुगम्य सार्वजनिक इमारती, शासकीय कार्यालये, वाहतूक व्यवस्था, डिजिटल माहिती व सेवा, ब्रेल सुविधा, स्पर्शज्ञान, फर्शी (टॅक्टाईल), ऑडिओ-व्हिज्युअल सहाय्य उपकरणे तसेच सार्वत्रिक प्रवेश (Universal Accessibility) सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिव्यांग व्यक्तींसाठी विशेष रोजगार विनिमय केंद्रे, कौशल्य विकास व प्रशिक्षण संस्था, स्वयंरोजगार व उद्योजकतेसाठी प्रोत्साहन योजना तसेच खाजगी व शासकीय क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी तसेच सदर व्हिजन डॉक्युमेंटनुसार विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी आवश्यक निधीची तरतूद, कालबध्द अंमलबजावणी आराखडा व जिल्हास्तरावरील यंत्रणा उभारणीसंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) "विकसित महाराष्ट्र, २०४७" या व्हिजन डाक्युमेंट कार्यक्रमाचा कृती आराखडा राज्य शासनाने तयार केला असून त्यामधील विकासाच्या सर्वसमावेशक घटकामध्ये "कल्याण" या उपघटकामध्ये दिव्यांग सक्षमीकरण विभागाचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर कृती आराखड्यामध्ये नमुद प्रमुख क्षेत्रांवर कार्यवाही सुरू आहे.
(२) होय, हे खरे आहे.

केंद्रशासनाच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या सन २०२२ च्या अधिसूचनेन्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार या विभागाच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी, सर्व आयुक्त महानगरपालिका, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सार्वजनिक ठिकाणे, सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, वाहतूक व्यवस्था, संकेतस्थळे व इतर अनुषंगीक सोयी-सुविधा सुगम्य करणे बाबत निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच, राज्यात शहरी अथवा ग्रामिण स्तरावर नविन इमारत आराखडा मंजूर करतेवेळी संबंधित इमारतीचे बांधकाम तसेच वसाहतींचे नियोजित आराखडे उपरोक्त मार्गदर्शक सूचनांनुसार दिव्यांगांसाठी सुगम्य करण्याची अट घालण्याचे आणि नवीन रस्ते व इमारतींच्या बांधकामांना सुगम्यतेच्या निकषांचे काटेकोरपणे पालन करण्याचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये नगरविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रामविकास विभाग यांना निर्देश देण्यात आले आहेत.
(३) विभागांतर्गत सुरू असलेल्या १०५ कर्मशाळा / कार्यशाळा यांच्या नावात "कौशल्य विकास व उद्योजकता केंद्रे" असा बदल करण्यात आला असून, त्यामधील प्रशिक्षण कोर्सेस अद्यावत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणेकरीता शासन निर्णय, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ अन्वये "दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता साधनसामग्री (Toolkit) घेण्यासाठी वित्तीय सहाय्य" ही योजना सुरू करण्यात आली आहे.

तसेच, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत "वैयक्तिक थेट कर्ज योजना व स्वावलंबन योजना" या कर्ज योजना राबविण्यात येत आहेत.

दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी वित्तीय सहाय्य सुलभरित्या उपलब्ध व्हावे याकरीता त्यांना सहाय्य करण्यासाठी "दिव्यांग व्यक्ती स्वयंरोजगार योजना" सुधारित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, विकसित महाराष्ट्र, २०४७ कृती आराखड्यातील दिव्यांग सक्षमीकरण विभागाविषयीचे प्रमुख घटक जसे - सामाजिक सुरक्षा, अडथळामुक्त सुलभता, शिक्षण, आरोग्य, पुनर्वसन, रोजगार, कौशल्य विकास इ. प्रमुख घटकांबाबत धोरण आखणे व त्याअनुषंगाने दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुगम्य करणे, १८ वर्षापर्यंत मोफत व सर्वसाधारण शिक्षण, जिल्ह्यामध्ये दिव्यांगांकरीता कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र इ. बाबत योजना तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यात बनावट संकेतस्थळावरुन नागरिकांची फसवणूक केली जात असल्याबाबत

**(२५)** * **७४६२ श्री.शशिकांत शिंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चलन तसेच परिवहन विभागाशी संबंधित विविध ऑनलाईन सेवांकरीता बनावट संकेतस्थळे, फसवे मोबाईल ॲप्लीकेशन तसेच मोबाईल वर व्हॉट्सॲपद्वारे पाठविण्यात येणाऱ्या खोट्या लिंकच्या माध्यमातून नागरिकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक तसेच वैयक्तिक माहितीची चोरी होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सातारा जिल्ह्यात आतापर्यंत किती गुन्हे कोणकोणत्या कलमान्वये नोंदविण्यात आले असून त्यापैकी किती प्रकरणांमध्ये आरोपींची ओळख पटविण्यात आली आहे व किती आरोपींना अटक करण्यात आली आहे तसेच फसवणूक झालेल्या रकमेपैकी किती रक्कम गोठविण्यात किंवा परत मिळविण्यात आली आहे,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी गंभीर दखल घेऊन सातारा जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी बनावट संकेतस्थळे व ॲप्लीकेशनवर बंदी घालून त्याबाबत जनजागृती मोहीम राबविणे, सायबर तपास यंत्रणा बळकट करणे तसेच संबंधित विभागांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) सातारा जिल्ह्यात ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी व ई-चलन आदी सेवांशी संबंधित बनावट संकेतस्थळ, फसवे मोबाईल ॲप्स तसेच मोबाईल वर व्हॉट्सॲपद्वारे पाठविण्यात येणाऱ्या खोट्या लिंकच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक झालेबाबत माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२५ मध्ये पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत पोलीस स्थानकांमध्ये गुन्हा दाखल झालेला नाही.

तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, सातारा या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी व ई-चलन आदी सेवांशी संबंधित बनावट संकेतस्थळावरुन नागरिकांची फसवणूक केली जात असल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

तथापि, मंगळवेढा (जि.सोलापूर) शहरात आरटीओच्या बनावट ई- चलन लिंक क्लिक केल्यामुळे एका नागरिकाची रुपये ८ लाख ४९ हजार ९९३ ची ऑनलाईन फसवणूक झाली आहे. याबाबत मंगळवेढा पोलीस ठाण्यात गु.नों. क्रमांक १०८७/२०२५ दिनांक २६/१२/२०२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. उमेदवाराशिवाय लर्निंग लायसन्स मिळण्याच्या गैरप्रकाराबाबत सहायक मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जालना यांनी पोलीस ठाणे, सायबर, जि.जालना येथे दिनांक २६/११/२०२५ रोजी दाखल केलेल्या तक्रारीस अनुसरुन सायबर गुन्हे शाखेत गुन्हा क्रमांक - २३ /२०२५, दाखल केला आहे व सायबर पोलीस स्टेशनकडून शिकाऊ अनुज्ञप्ती जारी झालेल्या IP Address ची तपासणी चालू आहे. पोलीस ठाणे सायबर, जि जालना येथे दाखल तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांनी चार आरोपींना अटक केली असून इतर आरोपींचा शोध सुरु आहे.

(३) राज्यातील वाहन चालक व नागरिक यांना बनावट परिवहन वेबसाईट, मोबाईल ॲप्स तसेच खोट्या ई-चलन लिंकपासून सतर्क रहाण्याकरीता सर्व वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्याबाबत महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना दिनांक ०९/१२/२०२५ आणि दिनांक १३/०२/२०२६ रोजी विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड किल्ल्यावरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(२६)** * **६६८७ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाकडून राज्यातील किल्ल्यांचे संवर्धन केले जात असताना दुर्गराज रायगडावर रोपवे कंपनीने विनापरवानगी हॉटेल, रेस्टॉरंट, कॅफेचे बांधकाम केल्याची बाब दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील किल्ल्यांचे संवर्धन पुरातत्व विभागाचे नियम आणि अटी याचे अधीन राहून करण्यात येते, पुरातत्त्व विभागाने रायगडावरील कामे थांबविण्याची रोपवे कंपनीस नोटीस देऊनही उक्त कामे पूर्ण करण्यात आली असून सदर कंपनीस बांधकामाची खुली मुभा दिल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दुर्गराज रायगडावर रोपवे कंपनीने पुरातत्व विभागाच्या नियम व अटींची पायमल्ली करून विनापरवानगी केलेल्या बांधकामाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि चौकशीच्या अनुषंगाने सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) नाही, हे खरे नाही.

रायगड किल्ला, ता. महाड, जि. रायगड हे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांच्या अखत्यारीतील केंद्र संरक्षित स्मारक आहे. सन १९९६ मध्ये उक्त जागेवर एका उपहारगृहासोबतच पर्यटकांसाठी एक प्रतीक्षा कक्ष बांधण्यात आले होते. मध्यंतरी कोकण विभागात आलेल्या 'निसर्ग' नामक चक्रीवादळामुळे सदरील वास्तूंच्या छताचे नुकसान झाल्यामुळे संबंधित रोप वे कंपनीने दुरुस्तीसाठी प्रस्ताव तयार करुन सक्षम अधिकारी तथा क्षेत्रीय निर्देशक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांना दि. ११.११.२०१९ रोजी सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या आधारे संबंधितांना दि. १७.१२.२०२० रोजी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांचे सक्षम अधिकारी, महाराष्ट्र यांनी रोप वे कंपनीस सदर ना हरकत प्रमाणपत्र देताना विहित अटी आणि शर्तींना अनुसरुन दुरुस्ती कार्य करावे असे निर्देशित केले होते. तथापि, सदर रोप वे कंपनीने ना हरकत प्रमाणपत्राच्या अटी आणि शर्तींचे तसेच मंजूर केलेल्या स्थळ नकाशापेक्षा अतिरिक्त काम केले असल्याचे जतन सहाय्यक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, रायगड उपमंडळ यांनी दि. २७.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये रायगड विकास प्राधिकरण यांच्या निदर्शनास आणले आहे. सदर अनियमितता दूर करण्यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांनी दि. १८.०९.२०२५ व दि. ०६.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिले असून सदर बाब दि. १६.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुख्यालय, नवी दिल्ली यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. याबाबतीत संबंधितांच्या समन्वयाने कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील केवळ १८ पाणथळ जागांनाच अधिकृत हेल्थ कार्ड मिळाल्याबाबत

**(२७) * ८०४१ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २३,०४६ प्रमुख पाणथळ जागांपैकी केवळ १८ पाणथळ जागांनाच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या इंडियन वेटलँड्स पोर्टलवरील आकडेवारीनुसार अधिकृत आरोग्य किंवा हेल्थ कार्ड मिळाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेरूळ मधील डिपीएस फ्लेमिंगो पाणथळ तलावात जाणारा भरती अहोटीचा प्रवाह अनेक महिन्यापासून अडवल्यामुळे साचलेले पानी फ्लेमिंगोसाठी अयोग्य असल्याचे तसेच उर्वरित पाणथळांना जागेअभावी जलविज्ञान, जैवविविधता, व्यवस्थापन योजना आणि मॅपिंगची याची सविस्तर नोंद नसल्यामुळे हेल्थकार्ड देण्यात आले नाही तसेच सदर पाणथळांची जागा नैसर्गिक पूर बफर, भूजल पुनर्भरण, कार्बन सिंक आणि जैवविविधतेचा ठेवा असून त्यांचे संरक्षण केले नसल्यामुळे देखील उक्त पाणथळांना हेल्थकार्ड मिळाले नसल्याचे आढळून आले आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील जास्तीत जास्त पाणथळ जागांना अधिकृत आरोग्य किंवा हेल्थ कार्ड मिळावे याकरीता तसेच पाणथळ जागांचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नेरुळ येथील डिपीएस तलावात जाणारा भरती ओहोटीचा प्रवाह अडविल्याचे निर्दशनास आलेले नाही.

तसेच सदर तलावाचे स्थलांतरीत पक्षी, व इतर पर्यावरणीय महत्व लक्षात घेऊन सदर तलावास संवर्धन राखीव क्षेत्र तयार करण्याबाबतचा प्रस्ताव कांदळवन कक्ष मुंबई यांनी दिनांक २७/१०/२०२५ अन्वये वन्यजीव (संरक्षण)अधिनियम १९७२ चे कलम ३६ (A) अन्वये महसूल व वन विभागास सादर करण्यात आलेला आहे.

तसेच हेल्थ कार्ड बनविण्या संदर्भात नमुद करण्यात येते की, इंडियन वेटलँड हे पोर्टल " जैवविविधता आणि हवामान संरक्षणासाठी पाणथळ जागा व्यवस्थापन " (२०१८-२०२३) या इंडो-जर्मन प्रकल्पांतर्गत केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय नवी दिल्ली यांनी विकसित केले होते. सदरचा पाणथळ जागेचे आरोग्य कार्ड तयार करणे हा उपरोक्त नमुद प्रकल्पातील भाग असून केंद्रशासनाच्या वतीने करण्यात आले होते.

सद्य:स्थितीत, राज्यातील पाणथळ जागांचे संरक्षण व व्यवस्थापन करण्यासाठी केंद्रीय पर्यावरण वने मंत्रालय, नवी दिल्ली यांनी पाणथळ जागा (संवर्धन व व्यवस्थापन) नियम २०१७ व नियमावली २०२० जारी करण्यात आली आहे. तदनुसार राज्यातील पाणथळ जागांचे सीमांकन व ब्रीफ डॉक्युमेंट तयार करण्यासाठी शासनाने केंद्र शासन अधिकृत National Centre for Sustainable Coastal Management Chennai या संस्थेची नियुक्ती केलेली आहे. सदर संस्थेकडून राज्यातील पाणथळ जागांचे सर्वेक्षणांची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नायलॉन मांजा विक्रीवर बंदी घालण्याबाबत

**(२८) * ८३०३ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विदर्भासह बहुतांश ठिकाणी नायलॉन मांजाची विक्री होत असून, नायलॉन मांजाचा वापर रोखण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी आदेश दिले असतानाही, नागरी भागांमध्ये या बाबतची सार्वजनिक सूचना प्रसिध्द करण्यात न आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक सूचना वेळेत प्रसिध्द न झाल्यामुळे नागरिकांमध्ये नायलॉन मांजावरील बंदीबाबत पुरेशी जनजागृती झाली नसून, त्यामुळे नायलॉन मांजाचा वापर सुरूच असल्यामुळे पक्षी, प्राणी व नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असून अनेक ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून हजारो रुपयांचा मांजा जप्त केला असतानाही मांजा विक्रीवर आळा बसलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नायलॉन मांजावरील प्रतिबंध प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित प्रशासकीय यंत्रणांकडून सूचना प्रसिध्द करणे, तपासणी करणे व कारवाई करणे या बाबींमध्ये हलगर्जीपणा झाल्यामुळे शासनाच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने नायलॉन मांजा वापरामुळे मोठ्या प्रमाणावर मनुष्य व प्राणी, पक्षी मृत्यू व जखमी झाले आहेत तसेच विदर्भात पतंग उडविताना विजेच्या तारांमुळे घडलेल्या अपघातांची व मृत्यूंची संख्या अधिक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन नायलॉन मांजा उत्पादक, ठोक व किरकोळ विक्रेते यांचेकडील मांजा जप्त करुन कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०१/०३/२०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार कृत्रिम (सिंथेटीक) धाग्यावर बंदी घालण्यात आली आहे. सदर अधिसूचनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाच्या दिनांक २५/०८/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यप्रणाली (Modality) निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सिंथेटीक / नायलॉन मांजाची विक्री, उत्पादन, साठवण, पुरवठा आणि वापर टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना तयार करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी, स्थानिक स्वराज संस्था, पोलीस विभाग, विभागीय परिवहन अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद व वन विभाग यांची आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे स्वाधिकारे दाखल जनहित याचिका प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नायलॉन मांजा वापरलेला पतंग उडविणारे लहान मुले, प्रौढ व्यक्ती आणि नायलॉन मांजा विक्री व साठवणूक करणारे व्यावसायिक यांच्याकडून दंडात्मक रक्कम वसूल करण्यात येणार असल्याबाबत नागपूर व अमरावती विभागातील कार्यालयाकडून वृत्तपत्रामध्ये सार्वजनिक सूचना प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.
(३) व (४) पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत नायलॉन मांजाचा वापर रोखण्याकरीता व त्यामुळे होणाऱ्या दुर्घटना रोखण्याकरीता सर्व पोलीस घटक प्रमुखांना त्यांच्या दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजीच्या ज्ञापनान्वये सुचित करण्यात आलेले आहे. तसेच त्यांचामार्फत सार्वजनिक ठिकाणी महत्वाचे चौक, उद्यान, बसस्थानक इ. ठिकाणी कॉर्नर बैठका घेऊन नायलॉन मांजा वापरावर बंदी असलेबाबत जनजागृती करण्यात येते. नायलॉन मांजाबाबत कोणतीही तक्रार / गोपनीय माहिती प्राप्त होताच पोलीस विभागामार्फत प्रचलित कायद्याने तात्काळ कारवाई करण्यात येत असते.

पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार सन २०२४ पासून जानेवारी २०२६ अखेर याअनुषंगाने एकूण १३०१ गुन्हे दाखल करून ११८८ आरोपींना अटक करण्यात आलेली असून रुपये ३,४७,१२,५३६/- इतक्या किंमतीच्या मांजाच्या जप्तीची कारवाई पोलिसांकडून करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमधील महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेकरिता ‘मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी’ पद पुनर्स्थापित करण्याबाबत

**(२९) * ७८२८ श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या महिलांना तिकीट दरात ५०% सवलत देणारी “महिला सन्मान योजना” दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास लागू करण्यात आली आहे, सदर सवलतीमुळे महिला प्रवाशांच्या संख्येत मोठी वाढ झाली असून, त्यासोबतच त्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दाही ऐरणीवर आला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महानिरीक्षक दर्जाचे ‘मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी’ हे जबाबदारीचे पद रस्ते परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार महामंडळात दिनांक ११ जुलै, १९५० पासून अस्तित्वात असून, गृह विभागाने गेल्या तीन वर्षांपासून म्हणजेच दिनांक ३० जून, २०२२ पासून उक्त पद गोठवून पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयामध्ये वर्ग केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास “महिला सन्मान योजना” अंतर्गत बसमधील महिला प्रवाशांची वाढलेली संख्या पाहता, त्यांच्या सुरक्षिततेसाठी गृह विभागाकडून हे पद तात्काळ पुनर्स्थापित करून महिलांच्या सुरक्षिततेसाठी व आत्मरक्षणासाठी या पदावर भारतीय पोलीस सेवेतील (I.P.S.) महिला पोलीस अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) “महिला सन्मान योजना” अंतर्गत दिनांक १७/०३/२०२३ पासून सर्व महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेस मध्ये प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत घोषित करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत दिनांक १७/०३/२०२३ ते दिनांक ३१/०१/२०२६ पर्यंत एकूण १७६.६४ कोटी महिला लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

(२) होय.

(३) व (४) राज्य परिवहन महामंडळातील मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी हे भारतीय सेवेतील स्थानांतरीत केलेले पद पुर्ववत करून मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी या पदावर भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्याची नियुक्ती करणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## बदलापूर (पश्चिम) येथे स्कूल व्हॅनमध्ये चार वर्षाच्या विद्यार्थिनीवर व्हॅनचालकाने अत्याचार केल्याबाबत

**(३०) * ७९४८ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (प.) येथे स्कूल व्हॅनमधून शाळेत ने-आण करित असताना चार वर्षांच्या विद्यार्थिनीवर व्हॅनचालकाने अत्याचार केल्याची अत्यंत गंभीर व अमानुष घटना घडल्याची बाब दिनांक २२ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित स्कूल व्हॅनमध्ये नियमानुसार महिला अटेंडंट नियुक्त नसल्यामुळे ही घटना घडल्याचा आरोप होत असून चालकासह संबंधित शाळा प्रशासनावर कठोर कारवाई करण्याची मागणी बदलापूर परिसरातील नागरिक व पालकांकडून करण्यात येत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, संबंधित आरोपी वाहनचालक, व्हॅन मालक व शाळा प्रशासनाविरुध्द कोणती फौजदारी व प्रशासकीय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, बदलापूर (प.) येथे गु.र.क्र.२२/२०२६ नुसार दिनांक २२/०१/२०२६ रोजी कलम ७४, ७५, ३५१ (२), ३५१ (३) भा.न्या.सं. सह कलम ८, १२ पोक्सो अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी आरोपीस दिनांक २२/०१/२०२६ रोजी अटक करण्यात येऊन दिनांक २७/०१/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. सदर आरोपी दिनांक २७/०१/२०२६ पासून न्यायालयीन कोठडीत आहे.तसेच आरोपीविरुध्द दिनांक २७/०२/२०२६ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरणातील वाहन हे खाजगी मालकीचे होते. त्यानुसार वाहनचालकावर उपरोक्तप्रमाणे गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, त्याचे ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित करण्यात आले असून संबंधित स्कूल व्हॅन मालकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्लास्टिक व कागदी कपावरील बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(३१)** * **८०८३ श्री.सत्यजीत तांबे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात हॉटेल आणि चहाच्या टपऱ्यांवर प्रतिबंधित प्लास्टिक व कागदी कपांचा सर्रास वापर होत असून केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने सन २०२१ मध्ये अधिसूचित केलेल्या प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियमानुसार सिंगल युज प्लास्टिकवर बंदी असतानाही त्याचे उल्लंघन होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्लास्टिक व कागदी कपामधून चहा घेतल्याने कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचा धोका असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत असूनही प्रशासनाकडून यावर कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक नगरपरिषदेमार्फत प्लास्टिक पिशव्या व कपांवर कारवाई करण्यासाठी पथके तयार करण्यात आली नसून दंडात्मक कारवाई करण्यात येत नसल्याने बेकायदेशीर प्लास्टिक विक्री व वापर वाढला असून तसेच प्लास्टिकचा वापर कायमस्वरूपी रोखण्यासाठी दंडाच्या रकमेत वाढ करून प्रशासकीय पातळीवर कडक अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्लास्टीक व थर्मोकॉल (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८, दिनांक २३/०३/२०१८ च्या अधिसूचनेव्दारे प्लास्टिक कपावर बंदी केली आहे. तसेच, दिनांक १५/०७/२०२२ च्या अधिसूचनेव्दारे प्लास्टिक लेपित कपांवर बंदी घालण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्लास्टिक अधिसूचना, २०१८ च्या अंमलबजावणीकरीता स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस विभाग प्रतिनिधी समवेत विविध विक्रेते व आस्थापनांना दरमहा भेटी देऊन एकल वापर प्लास्टिक विक्री व वापराबाबत तपासणी केली जाते. सदर तपासणी दरम्यान आढळून आलेल्या दोषींवर महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत दंडात्मक कारवाई केली जाते.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६ नुसार दंड व शास्तीची तरतूद करण्यात आली आहे.

१) पहिल्या अपराधासाठी दंड रुपये ५०००/-,

२) दुसऱ्या अपराधासाठी रुपये १०,०००/- व

३) तद्नंतरच्या अपराधासाठी तीन महिन्याच्या कारावासाची व त्यासोबत रुपये २५,०००/- इतक्या दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, स्थानिक संस्थांनी प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियमांच्या तरतुदींचा समावेश करून तयार केलेल्या उपविधी (By-Laws) नुसार दंडाचे प्रावधान केलेले आहे.

एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने दरमहा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, व पोलीस विभाग यांची संयुक्तपणे चार दिवस विशेष मोहीम राबविण्यात येते. यामध्ये मुख्यत: फेरीवाले, फुलविक्रेते, स्थानिक बाजारपेठ, भाजीबाजार, दुकाने, रेल्वेस्थानके, बसस्थानके, विमानतळे, घाऊक विक्रेते, मॉल्स, उपहारगृहे, उद्योग तथा आंतरराज्यीय सिमेवर तपासणी करुन दोषी आस्थापनांवर कारवाई करण्यात येते. महाराष्ट्र विघटनशील कचरा नियंत्रण कायदा २००६ अंतर्गत तरतुदीनुसार माहे एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ पर्यंत एकूण १,२४,७८३ आस्थापनांची पाहणी करण्यात आली आहे. त्यापैकी उल्लंघन करणाऱ्या ३३९० आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, एकूण रुपये १.५५ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच एकूण ६७.५४ मे. टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक व वाहकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२)** * **८२१७ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळात सुमारे ५,००० नवीन गाड्या दाखल होत असतानाच, महामंडळामध्ये सध्या ३,७३० वाहक आणि ६,७४७ चालकांची कमतरता असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांत्रिक विभागातील २७,०७४ मंजूर पदांच्या तुलनेत केवळ १५,५९१ कर्मचारी कार्यरत असून ११,४८३ तांत्रिक पदे रिक्त असल्याने गाड्यांच्या देखभालीवर व प्रवासी सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होत असून रिक्त पदांमुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर ‘डबल ड्यूटी’चा अतिरिक्त ताण येऊन नियमांचे उल्लंघन होत आहे व यामुळे सेवेच्या गुणवत्तेत घट होऊन अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळातील सदर रिक्त पदांच्या स्थितीबाबत व कंत्राटी भरती प्रक्रियेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व माहे मार्च, २०२६ पर्यंत रिक्त पदांवर बाह्यस्त्रोताद्वारे मनुष्यबळ घेण्याऐवजी महामंडळाच्या व्यवस्थापनात सुधारणा करून कायमस्वरूपी कर्मचारी भरती करुन प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) रा. प. महामंडळात सद्य:स्थितीत वाहक पदी २९,४७७ इतके कर्मचारी कार्यरत असून ४९६८ इतकी पदे रिक्त आहेत, चालकपदी२४,५३७ इतके कर्मचारी कार्यरत असून ७११६ इतकी रिक्त पदे आहेत. तसेच यांत्रिक पदावर १३,४९८ कर्मचारी कार्यरत असून ११,२३२ पदे रिक्त आहेत.

रा.प.वाहनांचे देखभालीचे नियतकालीक कार्यक्रम करुन वाहनांचा ताफा सुस्थितीत ठेवण्यात येतो.

रा.प.महामंडळामार्फत दैनंदिन वाहतुकीसाठी आवश्यक असणाऱ्या नियोजित फेऱ्या चालविण्यासाठी डबल ड्यूटी कामगिरीसाठी इच्छुक चालक व वाहकांना डबल ड्यूटी कामगिरी देवून कमतरता पूर्ण करण्यात येत आहे.

(३) व (४) रा.प.महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची दिनांक २५/०८/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये सरळसेवा भरतीबाबत घातलेले निर्बंध उठवून चालनिय पदे सरळसेवेने भरण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## राज्यातील नाशिकसह अन्य शहरांमध्ये माईस हब विकसित करण्याबाबत

**(३३) * ८३३३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने एमआयसीई (MICE) अर्थात मीटिंग्स, इन्सेंटिव्हज, कॉन्फरन्सेस आणि एक्झिबिशन्स या माध्यमातून पर्यटन वाढविण्यासाठी नवीन पर्यटन धोरणानुसार माईस ब्युरो या कंपनीची स्थापना केलेली असून, या कंपनीला या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थांशी चर्चा करणे, बोली लावणे व राज्यात गुंतवणूक वाढविणे या कामांसाठी पर्यटन विभागाने ६.६२ कोटी रुपये निधी वितरित करण्यास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत नाशिक येथे प्रस्तावित असलेले पहिले ‘माईस हब’ प्रत्यक्षात सुरू होऊ शकले नाही किंवा प्रकल्पाच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण झाल्याचे निदर्शनास आले असताना संबंधित योजनेसाठी निधी वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक तसेच राज्यातील इतर संभाव्य शहरांमध्ये ‘माईस हब’ विकसित करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, गुंतवणूक आकर्षित करणे, खाजगी सहभाग (PPP मॉडेल), जमीन उपलब्धता, वाहतूक व परिषद सुविधा उभारणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

MICE ब्युरो अंतर्गत प्रथम टप्प्यातील केंद्राचे मुख्य क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिका, MMR, नाशिक, नागपूर, पुणे असणार आहे.

नाशिक शहरामध्ये पर्यटन क्षेत्रातील अधिकाधिक गुंतवणूक वाढवूण पर्यटनाला चालना देण्यासाठी नाशिक शहरामध्ये MICE केंद्राची स्थापना करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत नाशिक महानगरपालिकेस विनंती करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाच्या भारत मंडपम प्रकल्पाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करणे, व्यापर मेळावे अधिवेशन परिषदा याकरीता राज्यातील नवी मुंबई, पुणे नागपूर, नाशिक या महापालिकांच्या क्षेत्रात सर्वसाधारण १०० ऐकर क्षेत्र MICE केंद्रासाठी आरक्षित ठेवण्याबाबत नगरविकास विभागास विनंती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांचे प्रस्ताव अनुदानाअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३४) * ७७८२ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण व लघु शेतकरी, बेरोजगार युवक तसेच स्वयंरोजगारास चालना देण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय तसेच पशुखरेदी व अनुदानावर आधारित विविध योजनांसाठी आवश्यक अनुदान उपलब्ध न झाल्यामुळे सदर योजना अनेक जिल्ह्यांमध्ये प्रभावीपणे राबविणे थांबले असून लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित राहिले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांसाठी केंद्र शासनाकडील अनुदान वितरणातील विलंब, राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतील कमतरता, प्रशासकीय प्रक्रियेमधील विलंब किंवा अन्य कारणांमुळे योजनांची अंमलबजावणी बंद झाल्याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तदनुसार अनुदान तात्काळ वितरीत करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियान (एनएलएम: NLM) योजनेच्या अंमलबजावणीत देशपातळीवर महाराष्ट्र राज्य चौथ्या क्रमांकावर आहे. राज्यातील एकूण मंजूर ३६६ प्रकल्पांपैकी २४० प्रकल्पांना केंद्र शासनाकडून अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत झाला असून प्रकल्प पूर्ण झालेल्या ७८ प्रकल्पांना अनुदानाचा दुसरा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. यामध्ये सातारा जिल्ह्यातील १८ प्रकल्पांचा समावेश आहे. सदर योजनेंतर्गत जास्तीत जास्त निधी प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

राज्य योजना/ जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात दुधाळ जनावरे गट वाटप, शेळी/ मेंढी गट वाटप व कुक्कुटपालन योजनेसाठी लाभार्थी निवड प्रक्रीया ऑनलाईन पध्दतीने पूर्ण झाली असून वित्तीय वर्षाअखेरीस रुपये १६५.६५ कोटी इतक्या निधीचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येईल. यामध्ये सातारा जिल्ह्यासाठी रुपये १.८६ कोटी इतक्या निधीचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील ‘स्मार्ट सिटी’ प्रकल्पातील ‘फ्लड सेन्सर’ यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(३५) * ७८७६ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **माहिती तंत्रज्ञान मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील ‘स्मार्ट सिटी’ प्रकल्पांतर्गत पूर नियंत्रण व हवामान नोंदीसाठी २० ठिकाणी ४० लाख रुपये खर्च करून बसविलेले ‘फ्लड सेन्सर’ आणि अन्य यंत्रणा गत ६ वर्षांपासून वापराविना पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर यंत्रणा खरेदीसाठी लाखो रुपयांचा खर्च करूनही त्या कार्यान्वित न झाल्याने पूरकाळात आपत्कालीन इशारा मिळण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आगामी सन २०२७ मधील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, गोदावरी नदी पात्रात स्नान करणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी ही ‘फ्लड अलर्ट’ यंत्रणा अत्यंत आवश्यक असताना ती निकामी ठेवल्याने होणाऱ्या संभाव्य धोक्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर धोका निवारणार्थ शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) हे खरे नाही.

स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत पूर नियंत्रण व हवामान नोंदणीसाठी बसविण्यात आलेले २० फ्लड सेन्सर पैकी १२ कार्यान्वित असून उर्वरित नियमित तांत्रिक देखभाल व दुरुस्तीमध्ये आहेत. तसेच २६ एन्विरॉन्मेंटल सेन्सर (ES) पैकी सध्या २१ सेन्सर कार्यान्वित असून उर्वरित नियमित तांत्रिक देखभाल व दुरुस्तीमध्ये आहेत. फ्लड सेन्सर आणि एन्विरॉन्मेंटल सेन्सर डिसेंबर २०२३ पासून कार्यान्वित आहेत.

(३) उर्वरित फ्लड सेन्सर व एन्विरॉन्मेंटल सेन्सर ३१ मार्च, २०२६ पर्यंत तांत्रिक घटकांची पूर्तता करून सर्व सेन्सर महाआयटी कडून कार्यान्वित करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही

-----------------

## महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातील जवानांना सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत

**(३६)** * **८१२० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातील हजारो जवान मागील १५ वर्षांपासून कंत्राटी पध्दतीने कार्यरत असून, त्यांना तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागत असून १५ वर्षांपासून काम करणाऱ्या अनुभवी जवानांना आणि नव्याने भरती झालेल्या जवानांना कोणताही भेदभाव न ठेवता सरसकट २१,००० रुपये वेतन दिले जाते व त्यांना कोणतीही ग्रॅच्युइटी किंवा इतर सेवाविषयक लाभ मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या महागड्या शहरात कर्तव्य बजावताना वेतनाचा मोठा हिस्सा घरभाड्यासाठी खर्च होत असल्यामुळे जवानांना आपल्या मुलांचा व वृध्द पालकांचा सांभाळ करणे कठीण झाले असून ते कायम आर्थिक विवंचनेत राहत असून कठीण परिस्थितीत कर्तव्य बजावूनही जवानांना कायमस्वरूपी सेवेचे संरक्षण नसल्यामुळे त्यांच्यामध्ये अन्यायाची व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच या जवानांना न्याय देण्यासाठी त्यांच्या वेतनवाढीबाबत व त्यांना टप्प्याटप्प्याने कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अ.महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम, २०१० नुसार महामंडळातील सुरक्षाकर्मी यांची नेमणूक कंत्राटी तत्वावर करण्यात येते.

सद्य:स्थितीत सुरक्षाकर्मीना प्रतिमहिना ₹२१,४६०/- इतके वेतन अदा करण्यात येत आहे.

- नोव्हेंबर, २०२३ पासून सुरक्षाकर्मींच्या मूळ वेतनामध्ये २७% (रुपये ४,५००/-) इतकी वाढ करण्यात आलेली आहे.
- त्यानंतर एप्रिल, २०२५ पासून मूळ वेतनामध्ये अतिरिक्त ४% (रुपये ५६०/-) वाढ मंजूर करण्यात आलेली आहे.
- वेतनाव्यतिरिक्त महामंडळातील सुरक्षाकर्मीना खालील लाभ देण्यात येतात.
- EPF व ESIC अंतर्गत आर्थिक लाभ देण्यात येतात.
- गणवेश भत्ता म्हणून रुपये २,५००/- स्वतंत्रपणे अदा करण्यात येतो.
- अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ नियमांनुसार देण्यात येतो.
- महिला सुरक्षाकर्मीना ०३ (तीन) महिने पूर्ण वेतनासह प्रसूती रजा मंजूर करण्यात येते.
- सर्व सुरक्षाकर्मीना प्रतिवर्षी रुपये ५,०००/- ते रुपये ७,०००/- इतका दिवाळी बोनस देण्यात येतो.

- ESIC योजनेंतर्गत पात्र नसलेल्या वरिष्ठ पदावरील सुरक्षाकर्मींना ₹२,००,०००/- पर्यंतची वैद्यकीय विमा सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर विम्याकरीता वार्षिक प्रीमियम ₹१२,२८२/- असून त्यापैकी ७५% रक्कम (₹९,२१२/-) महामंडळामार्फत अदा करण्यात येते.
- सुरक्षाकर्मींना मूळ वेतन व महागाई भत्ता यांच्या एकत्रित रकमेच्या ४०% इतका घरभाडे भत्ता मंजूर करण्यात येतो.
- याप्रमाणे सुरक्षा रक्षक पदावरील जवानाकरीता वेतन व इतर भत्ते यासह महामंडळाचा दरमहा अंदाजे रुपये २६,२६०/- इतका खर्च होतो.
- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे उत्पन्नाचे एकमेव साधन आस्थापनांकडून घेण्यात येत असलेले सुरक्षा शुल्क असून त्यामधून सुरक्षाकर्मींचे वेतन अदा करण्यात येते.

(३) महामंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार सुरक्षाकर्मींची सेवा कंत्राटी तत्वावरील असून आस्थापनांकडून घ्यावयाचे शुल्क संचालक मंडळाकडून वेळोवेळी वाढविण्यात येते व अशी शुल्कवाढ केल्यावर त्या वाढीच्या प्रमाणात सुरक्षाकर्मींना वेतनवाढ वेळोवेळी वाढविण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.